ePaper

## हिंदुंमध्ये भेदभावाचे विष कालवणे घातक! उध्दव ठाकरे यांची नरेंद्र मोदी यांच्यावर टीका!



| वर्ष - 7 | अंक - 255 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- आयसीसी संघातून विराटला डच्चू!
- फतेहीचा डीपफेकचा व्हायरल व्हिडिओ!
- काँग्रेस कार्यकर्ते पोलिसांमध्ये झटापट
- जा त्या लबाड नार्वेकरांना सांगा!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 24 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागताची पिंपरी चिंचवडमध्ये तयारी पूर्ण!

## » शहरातील मराठा क्रांती मोर्चा, सकल मराठा समाज व शेकडो मंडळे करणार स्वागत

। पिंपरी । महाईन्यूज ।

**सर्वोच्च मनोज जरांगे पाटील यांच्यासह लाखों मराठा बांधव आंदोलनासाठी मुंबईकडे निघाले आहेत.सर्व आंदोलक बुधवार दिनांक 24 रोजी मार्गे पदयात्रेने शहरात दाखल होत आहेत. पिंपरी चिंचवड शहरात सांगवी फाटा येथे विविध संघटना व सार्वजनिक मंडळ जरांगे पाटील यांचे भव्य स्वागत करणार आहेत. यानंतर रक्षक सोसायटी चौक येथे पिंपळे निलख ग्रामस्थ तसेच जगताप डेअरी चौकामध्ये रहाटणी व पिंपळे सौदागरचे ग्रामस्थ काळेवाडी फाटा येथे काळेवाडी चे ग्रामस्थ व विविध मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात येणार आहे. सोळा नंबर बस स्टॉप थेरगाव येथे मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व संतोष मंगल कार्यालयाचे सचिन बारणे व विविध मित्र मंडळ मोठ्या उत्साहात स्वागत करून अन्नदान तसेच पाणी वाटप करणार आहेत.**



छत्रपती शिवाजी महाराजांच्या डांगे चौक थेरगाव येथील पुतळयास पुष्पहार अर्पण करून जरांगे पाटील अभिवादन करणार आहेत. काळेवाडी फाटा ते बिर्ला हॉस्पिटल रोडवर शेकडो मंडळी व सामाजिक संघटना थेरगाव ग्रामस्थ वाकड ग्रामस्थ ताथवडे ग्रामस्थ यांच्या वतीने स्वागत करणार आहेत. याप्रसंगी सर्वच मंडळे अन्नदान वाटप फळे वाटप पाणी चहा वाटप करणार आहेत चिंचवडे लॉन्स वाल्हेकरवाडी कॉर्नर चिंचवड येथे चिंचवड ग्रामस्थ सकल मराठा समाज मराठा क्रांती मोर्चा व विविध मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात येणार आहे चिंचवडगाव येथील चाफेकर पुतळा चिंचवड स्टेशन येथील लहुजी वस्ताद साळवे व वासुदेव बळवंत फडके यांच्या पुतळ्यास जरांगे पाटील अभिवादन करणार आहेत. आकुर्डी ग्रामस्थांच्या वतीने जरांगे पाटील यांचे ढोल ताशांच्या गजरात फुले उधळून स्वागत करण्यात येणार आहे याप्रसंगी खंडोबा मंदिरात जरांगे पाटील यांच्या हस्ते आरती होणार आहे. भक्ती शक्ती समोर शिल्प छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम महाराजांना

### विविध सामाजिक संस्था पक्ष सार्वजनिक मंडळ यांच्या सहकार्याने नियोजन

»आकुर्डी येथे डॉ.प्रसाद देशमुख व सहकाऱ्यांच्या वतीने मोफत वैद्यकीय उपचार करण्यात येणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पाणीपुरवठा टँकर सुविधा व स्वच्छतागृहाची व्यवस्था पदयात्रा मार्गावर मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील मराठा क्रांती मोर्चा सकल मराठा समाज व विविध मंडळाचे हजारो कार्यकर्ते मोर्चा सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम करत आहेत. शहरातील पोलीस प्रशासन व महानगरपालिका प्रशासन उत्तम सहकार्य करत आहेत. शहरातील विविध राजकीय पक्ष सुद्धा जरांगे पाटील यांचे अनेक ठिकाणी स्वागत करणार आहेत पदयात्रा व्यवस्थित पार पाडण्यासाठी सकल मराठा समाज तसेच मराठा क्रांती मोर्चाचे सतीश काळे, वैभव जाधव, नकुल भोईर, प्रकाश जाधव, सचिन बारणे, मारुती भापकर, सचिन चिखले, मीरा कदम, सागर तापकीर, नवीन भालेकर, सचिन काळभोर, सागर चिंचवडे, दौलत चिंचवडे, मनोज आण्णा मोरे, अरुण पवार, शिवाजी पाडाळे, गणेश देवराम यांच्या सहकार्याने अनेक कार्यकर्ते तसेच पोलीस प्रशासन महानगरपालिका प्रशासन तसेच शहरातील विविध सामाजिक संस्था पक्ष सार्वजनिक मंडळ यांच्या सहकार्याने नियोजन करत आहेत.

# पोटमाळ्यावर झोपलेल्या दोन सख्ख्या भावांचा होरपळून मृत्यू!

## » झोपेत असतानाच काळाचा घाला

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शहरात आगीमध्ये होरपळून दोघांचा मृत्यू झाला आहे. ही घटना मध्यरात्री अडीचच्या सुमारास वाल्हेकरवाडी येथे घडली आहे. ललित अर्जुन चौधरी (वय २१) आणि कमलेश अर्जुन चौधरी (वय २३) या सख्ख्या भावांचा मृत्यू झाला आहे. आधी लाकडाच्या वखारीला भीषण आग लागली, मग त्याच्या झळा शेजारील विनायक अल्युमिनियम प्रोफाइल डोअर बसल्याने भीषण आग लागली. आगीत पोटमाळ्यावर झोपलेल्या दोघांचा झोपेतच होरपळून मृत्यू झाला आहे. अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार, मध्यरात्री शहरातील वाल्हेकरवाडी येथे लाकडाच्या वखारीला भीषण आग लागली. याची छळ शेजारील दुकानांना बसल्याने त्याही दुकानांना भीषण आग लागली. शेजारील दुकानात दोन जण झोपले होते, त्यांचा झोपेतच बेशुद्ध होऊन होरपळून मृत्यू झाला आहे. लाकडाची वखार जळून खाक झाली आहे. एक चारचाकी देखील जळाली आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाची ५ वाहनं दाखल झाली होती. तर, अग्निशमन दलाच्या ४० जवानांनी आगीवर नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत.



# जरांगे यांची पदयात्रा पुण्यात दाखल!

## मराठा समाजाच्या सर्वेक्षणाचा पुण्यात पहिल्याच दिवशी फज्जा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाच्या वतीने राज्यात सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यासाठी गोखले इन्स्टिट्यूटकडील मुख्य प्रशिक्षकांमार्फत (मास्टर ट्रेनर) प्रशिक्षण देण्यात आले. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सुमारे दहा हजार प्रगणकांमार्फत बुधवारी सकाळी प्रत्यक्षात सर्वेक्षणाला सुरुवात झाली.**



सकाळच्या सत्रात सॉफ्टवेअर चांगली सुरू होते, मात्र, दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास राज्यभरात एकाचवेळी संगणकप्रणाली वापरात आल्याने सर्व्हर डाऊन झाला.सर्वेक्षणाचे काम ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करायचे नियोजन आहे. त्यासाठी ग्रामीण भागात तालुकास्तरावर १५ नोडल अधिकारी, १५ सहायक नोडल अधिकारी, ४६६ पर्यवेक्षक आणि ६५९६ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात सुमारे साडेतीन हजार प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. बुधवारी प्रत्यक्षात सर्वेक्षणासाठी प्रगणकांनी काम सुरु केले. मात्र, सर्वेक्षण सुरु होताच दुपारी बारा वाजल्यापासून सर्व्हर डाऊन झाला, मोबाइल ॲपमधील काही ऑप्शन उघडले जात नव्हते. परिणामी सर्वेक्षणाचा पहिल्याच दिवशी फज्जा उडाला. याबाबतच्या तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाल्या. याबाबतची माहिती मागासवर्ग आयोगाला देण्यात आली. त्यानुसार सर्व्हरमध्ये सुधारणा केली जात असल्याचे कळवण्यात आले. मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणाचा मंगळवारी पहिला दिवस होता. एकाचवेळी संगणकप्रणाली वापरात येत असल्याने सर्वेक्षणाचे काम संथगतीने मात्र सुरू होते, असे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी सांगितले. मराठा आरक्षण आता अंतिम टप्प्यात असून या लढाईसाठी सर्वांनी मोठ्या संख्येने मुंबईत यावे आणि मराठा समाजाने आपल्यातील एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन मराठा आरक्षण क्रांती योद्धे मनोज जरांगे यांनी मंगळवारी केले. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळाले पाहिजे ही आमची आग्रही मागणी असल्याचे यांनी सांगितले. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवली सराटी येथून मुंबईकडे रवाना होत असलेल्या मनोज जरांगे यांच्या पदयात्रेचे शिरूर येथील सतराकमानीचा पुलाजवळ भव्य असे स्वागत करण्यात आले. मोठ्या क्रेनद्वारे त्यांना पुष्पहार घालण्यात आला. त्यानंतर प्रभू श्रीराम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर जरांगे यांनी संवाद साधला.जरांगे म्हणाले की समाजाचा प्रगतीसाठी आणि लेकरांच्या भविष्यासाठी शहाणपणाची भूमिका घ्यावी लागेल. शरीर साथ देत नसताना जातीसाठी, समाजासाठी जीवाची ही पर्वा न करता आंदोलन करत आहे. मराठ्यांचा ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत. त्यांना शासनाने ओबीसीचे प्रमाणपत्र द्यावे. शेवटच्या मराठाला आरक्षण मिळेपर्यंत आपण हटणार नाही. आरक्षण अंतिम टप्प्यात असून ही संधी सोडू नका. आपल्यातील एकजूट कायम ठेवा. मराठे एकत्र आले तर ही जात प्रगत होईल आणि कोणापुढे हात पसरण्याची वेळ ही येणार नाही. आरक्षणाने लेकरांचे आयुष्यभराचे कल्याण होईल. मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने मुंबईत दिसतील. इतक्या वर्षात जाणूनबुजून मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटू दिला नाही. मराठा एक होऊ नये म्हणून प्रयत्न झाले. आता मात्र समाज एकजूट होत आहे. आंतरवलीमधून निघाल्या पासून विविध गावांतील लोक ठिकठिकाणी स्वागत करत आहे.

### आरक्षण मिळेपर्यंत हटणार नाही

» जरांगे म्हणाले की समाजाचा प्रगतीसाठी आणि लेकरांच्या भविष्यासाठी शहाणपणाची भूमिका घ्यावी लागेल. शरीर साथ देत नसताना जातीसाठी, समाजासाठी जीवाची ही पर्वा न करता आंदोलन करत आहे. मराठ्यांचा ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत. त्यांना शासनाने ओबीसीचे प्रमाणपत्र द्यावे. शेवटच्या मराठाला आरक्षण मिळेपर्यंत आपण हटणार नाही. आरक्षण अंतिम टप्प्यात असून ही संधी सोडू नका. आपल्यातील एकजूट कायम ठेवा. मराठे एकत्र आले तर ही जात प्रगत होईल आणि कोणापुढे हात पसरण्याची वेळ ही येणार नाही. आरक्षणाने लेकरांचे आयुष्यभराचे कल्याण होईल. मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने मुंबईत दिसतील.मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाच्या वतीने राज्यात सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यासाठी गोखले इन्स्टिट्यूटकडील मुख्य प्रशिक्षकांमार्फत (मास्टर ट्रेनर) प्रशिक्षण देण्यात आले.

# सरकारला विचारण्याची 38 खासदारांमध्ये हिंमत नाही

## कांद्याला भाव द्या म्हणून सरकारला विचारण्याची हिम्मत नाही : खा. सुळे

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रातील गप्प बसलेले 38 खासदार मला सभागृहाबाहेर चांगला प्रश्न उपस्थित केला म्हणून कौतुक करतात.परंतु त्यांच्यामध्ये शेतक-यांच्या कांद्याला भाव द्या म्हणून सरकारला विचारण्याची हिम्मत नाही, असा निशाणा खा. सुप्रिया सुळे यांनी विरोधकांवर साधला. निरा (ता.पुरंदर) येथील व्यापारी व डॉक्टर यांच्याशी खा. सुळे यांनी संवाद साधला.**



या वेळी निरेच्या सरपंच तेजश्री काकडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष माणिकराव झेंडे, लक्ष्मणराव चव्हाण, संभाजीराव झेंडे, विजय कोलते, दत्तात्रय चव्हाण ,बबूसाहेब माहुरकर, पुष्कराज जाधव, उपसरपंच राजेश काकडे, चंदरराव धायगुडे , डॉ.वसंत दगडे, डॉ.सतीश खलाटे, पृथ्वीराज चव्हाण, राजेंद्र जैन, शांतिकमार कोठडिया यांच्यासह व्यापारी, डॉक्टर, ग्रामस्थ उपस्थित होते.खा.सुळे म्हणाल्या की, निरा गावातील लोकांचे राहणीमान कसे वाढेल तसेच आर्थिक परिस्थिती व बाजारपेठ कशी वाढेल यासाठी प्रयत्न करणार आहे. या वेळी संदीप धायगुडे यांनी निरा येथील व्यापार वाढीसाठी निरा बाजार समितीत कांदा व गुळाचा मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू करावा तसेच जेजुरी एमआयडीसीत रोजगारासाठी जाणा-या व येणा-या कामगारांच्या सोईकरिता पीएमटी सेवा सुरू करावी. मुस्लिम समाजाच्या मशिदीकडे जाणा-या रस्त्यावर रेल्वेच्या हद्दीत भुयारी मार्ग करण्याबाबत रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करावा.

### राष्ट्रीयीकृत बँकेकडून व्यापा-यांना कर्ज

» महाराष्ट्रातील गप्प बसलेले 38 खासदार मला सभागृहाबाहेर चांगला प्रश्न उपस्थित केला म्हणून कौतुक करतात.तसेच उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय सुरू करावे आदी मागण्या मांडल्या. निरा बाजार समितीचे संचालक राजकुमार शहा यांनी निरागाव गावठाण नसल्याने राष्ट्रीयीकृत बँकेकडून व्यापा-यांना कर्ज मिळत नसल्याने निरा गावठाण करण्याची मागणी केली. डॉ.राम रणनवरे यांनी निरा येथे रक्तपेढी सुरू करण्याची मागणी केली. जि.प.शाळेचे शिक्षक नवनाथ गायकवाड यांनी निरा येथील जि.प.शाळेच्या बांधकामासंदर्भातील अनुदानाबाबत असलेल्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणी सोडविण्याची मागणी केली. या वेळी सरपंच तेजश्री काकडे व उपसरपंच राजेश काकडे यांनी ग्रामस्थांच्या वतीने खा.सुप्रिया सुळे यांचा सत्कार केला. यावेळी दत्तात्रय चव्हाण यांनी प्रास्ताविक केले.

# आंदोलनाची पन्नाशी, आमदारांच्या दाराशी!

## अंगणवाडी सेविकांचे 14 आमदारांच्या कार्यालयाबाहेर निदर्शने

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आपल्या विविध मागण्यांसाठी राज्यातील अंगणवाडी सेविकांचं 4 डिसेंबर 2023 पासून आंगणवाडी बंद आंदोलन सुरू आहे. सोमवारी (ता. 22) त्याला पन्नास दिवस झाले. त्यानिमित्त त्यांनी पिंपरी-चिंचवडमधील तीन, मावळातील एक आणि पुणे शहरातील नऊ आणि पुरंदर अशा 14 आमदारांच्या कार्यालयाबाहेर आंदोलनाची पन्नाशी, आमदारांच्या दाराशी हे इशारा आंदोलन मंगळवारी (ता. 23) रोजी दोन तास केले. आठवडाभरात मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर या आमदारांच्या कार्यालयाबाहेरच बेमुदत उपोषण करण्याचा इशारा आंगणवाडी सेविकांनी दिला आहे. पिंपरी-चिंचवडमधील भाजपचे भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या भोसरी, चिंचवडच्या अश्विनी जगताप यांच्या पिंपळे गुरव, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार) पिंपरीचे अण्णा बनसोडे यांच्या आकुर्डी, तर मावळचे सुनील शेळके यांच्या तळेगाव दाभाडे (ता. मावळ) येथील कार्यालयाबाहेर अंगणवाडी सेविकांनी हे इशारा आंदोलन केले.**




पुण्यातील आमदार सिद्धार्थ शिरोळे (शिवाजीनगर), चेतन तुपे (हडपसर), माधुरी मिसाळ (पर्वती), चंद्रकांत पाटील (कोथरुड), रवींद्र धंगेकर (कसबा), सुनील कांबळे (कॅन्टोन्मेंट), भीमराव तापकीर (खडकवासला), सुनील टिंगरे (वडगाव शेरी) आणि संजय जगताप (पुरंदर) यांच्या कार्यालयासमोर ते केले गेले. त्यावेळी बहुतांश आमदार तेथे नव्हते.

त्यामुळे त्यांच्या कार्यालयात निवेदन देऊन आंदोलन समाप्त करण्यात आले. मात्र, आठवडाभरात मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर या आमदारांच्या कार्यालयाबाहेरच बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचा इशारा महाराष्ट्र अंगणवाडी कर्मचारी सभेचे अध्यक्ष नितीन पवार यांनी दिला आहे.

मानधनवाढ, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा, ग्रॅच्युइटी, पेन्शन, कामकाजासाठी नवीन मोबाईल/टॅब आदी मागण्यांसाठी 4 डिसेंबर 2023 पासून अंगणवाडी सेविकांचं हे बंद आंदोलन विविध सनदशीर मार्गाने सुरू आहे. मात्र, त्याला राज्य सरकारने अद्याप सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही. म्हणून ज्या आमदारांच्या पाठबळावर सरकार बनते आणि चालते त्या आमदारांच्या कार्यालयावर अंगणवाडी कर्मचारी सभेच्यावतीने हे आंदोलन करण्यात आले.

### शंभरावर अंगणवाडीताई सामील

» सोमवारीच आंदोलन करण्यात येणार होते. पण, अयोध्येतील श्रीरामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेच्या सोहळ्यानिमित्त पोलिसांवरील बंदोबस्ताचा ताण विचारात घेऊन आयोजकांनी ते आज केले. दुसरीकडे या अंगणवाडी बंद आंदोलनामुळे गेल्या 50 दिवसांपासून राज्यातील वाडीवस्ती गावपाड्यामधील गरीब घटकातील 70 लाख चिमुकले पोषण आहारापासून आणि पूर्व प्राथमिक शिक्षणापासूनही वंचित आहेत. प्रत्येक आमदाराच्या कार्यालयाबाहेर शंभरावर अंगणवाडीताई सामील झाल्या होत्या.

### आमदार तुपाशी, अंगणवाडी सेविका उपाशी

» राज्यातील अंगणवाडी सेविकांचा विविध मागण्यांसाठी गेल्या 50 दिवसांपासून संप चालू असून, अद्यापही शासन दरबारी त्यांच्या मागण्यांना यश मिळाले नाही. याच पार्श्वभूमिवर मंगळवारी सकाळी 11 वाजता मावळ तालुका अंगणवाडी सेविकांनी आमदार सुनील शेळके यांच्या निवासस्थानाबाहेर घोषणा देत आंदोलन केले. तसेच विविध मागण्यासांठी निवदेन देण्यात आले. आंदोलनाची पन्नाशी, आंमदारांच्या दाराशी, अंगणवाडीताई उपाशी, आमदार तुपाशी, अंगणवाडी सेविका उपाशी, अशा घोषणा डोक्यावर टोप्या घालून देण्यात आल्या.

---

# टाटा मोटर्स एम्प्लॉईज युनियनच्या सदस्यपदी सचिन लांडगे विजयी

## कामगारांनी सलग चौथ्यांदा दाखवला विश्वास; निकालानंतर भंडारा उधळून आनंदोत्सव

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक क्षेत्राचा 'कणा' असलेल्या टाटा मोटर्स एम्प्लॉईजन युनियन सदस्यपदाच्या निवडणुकीत कामगार बंधू सचिन लांडगे यांनी पुन्हा एकदा बाजी मारली आहे. या निवडणुकीत विजयाचा 'चौकार' मारल्यामुळे त्यांच्यावर कामगार क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**



टाटा मोटर्स कंपनीच्या एम्प्लॉईज युनियनच्या कार्यकारिणीसाठी तीन वर्षांच्या कालावधीसाठी निवडणूक होत असते. या निवडणुकीकडे कामगार क्षेत्राचे लक्ष असते. कंपनीच्या पॅसेंजर्स व्हेईकल बिझनेस युनिट व कमर्सिअल व्हेईकल बिझनेस युनिट असे एकूण ५ हजार ३७४ कामगारांनी मतदान केले. ट्रान्स एक्सल शॉप विभागात २२५ मतदार आहेत. त्यापैकी २१९ कामगारांनी मतदानाचा अधिकार बजावला. १४२ मते घेवून कामगार बंधू सचिन लांडगे विजयी झाले आहेत.

गेल्या २५ वर्षांपासून कामगार नेते सचिन लांडगे टाटा मोटर्स कंपनीमध्ये कार्यरत असून, कामगारांनी सलग चौथ्यांदा त्यांच्यावर विश्वास टाकला आहे. लवकरच युनियनच्या नवीन कार्यकारिणीची निवड होणार आहे. निवडणुकीनंतर कामगार बंधू सचिन लांडगे आणि समर्थकांनी भंडारा उधळून आनंद साजरा केला.

> “ टाटा मोटर्स ही पिंपरी-चिंचवड शहरातील कामगार विश्वातील महत्त्वाची कंपनी आहे. या कंपनीच्या माध्यमातून हजारो कुटुंबांना आधार मिळाला आहे. कामगार हा या कंपनीचा मुख्य आधार असून, कामगारांच्या हक्कांसाठी युनियनच्या माध्यमातून आम्ही कायम आग्रही राहिलो आहोत. निवडणुकीत मतदान केलेल्या सर्व सहकारी कामगार बंधुंचे मी मनापासून आभार व्यक्त करतो आणि कामगारांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही देतो.
> **- सचिन लांडगे,** कामगार बंधू, टाटा मोटर्स एम्प्लॉईज युनियन.




# केवळ निर्माण नव्हे, हे नवप्रबोधन!

**अयोध्येच्या राम मंदिरात झालेली प्राणप्रतिष्ठा हा निव्वळ धार्मिक कार्यक्रम नसून, येणाऱ्या पिढ्यांसाठी भारतीय संस्कृती-सभ्यतेचे वैशिष्ट्य ठरणारा तो एक टप्पा आहे. भेदाभेद न मानणाऱ्या श्रद्धेशी वचनबद्धतेचा प्रगतिशील संदेश घोषित करण्याचे ते एक साधन आहे. रामजन्मभूमीच्या पुनर्स्थापनेची चळवळ ही कोणत्याही धर्माविरुद्धची लढाई किंवा इतिहासाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न नव्हता.**

हिंदूंच्या जागतिक दृष्टिकोनाला आकार देणाऱ्या संस्कृतीशी बांधिलकीची घोषणा करणे हे त्या चळवळीचे ध्येय होते. प्रभू राम हा काही नवसाला पावणारा देव नाही, या दैवताने जीवनाचे आदर्श मांडले आहेत. जे सद्गुण आत्म्याच्या उन्नतीसाठी, सुसंवादी सामाजिक व्यवस्थेसाठी, सर्वसमावेशक कल्याणासाठी आवश्यक मानले जातात त्या साऱ्यांचे प्रतीक म्हणजे हे दैवत आहे.



म्हणूनच ते संप्रदायांच्या पलीकडे जाणारे आहे. या गुणांमुळेच काळाच्या, प्रांतांच्या आणि धार्मिक तत्त्वज्ञानाच्या मर्यादा या 'मर्यादापुरुषोत्तमा'ने ओलांडल्या आहेत.यापूर्वीही भारताच्या स्वातंत्र्यानंतर सोमनाथ मंदिराची पुनर्बांधणी करण्यात आली होती. पण दोन्ही पुनर्रचनांमध्ये मोठा फरक आहे. पहिले पुनर्निर्माण राजकीय आणि सांस्कृतिक अभिजन वर्गामार्फत पार पडले. त्यामागच्या विचारांवर तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील विरोधकांकडूनही मर्यादितच चर्चा झाली. या सोहळ्याला जनता निव्वळ प्रेक्षक होती. याउलट राम मंदिर आंदोलनात सर्व धर्म आणि पंथांच्या सामान्य जनतेचा सहभाग असल्याचे आणि मोठ्या प्रमाणावर विचारमंथन घडल्याचे दिसले. ही चळवळ राजकीय किंवा सांस्कृतिक उच्चभ्रूंपुरती नव्हती. या प्रक्रियेत जी चर्चा होत राहिली, त्यामुळेच तर सध्याच्या पिढीला आताच्या 'सभ्यतेचा संघर्ष' असलेल्या जगातसुद्धा भारताच्या सांस्कृतिक अपवादात्मकतेची पुरेपूर जाणीव झालेली आहे. रामजन्मभूमी चळवळीच्या वैचारिक विरोधकांनी हा भारताच्या उदारमतवादी-धर्मनिरपेक्ष मूल्यांवर हल्ला ठरवून, त्याचा निषेध केला. पुरातत्त्वीय पुरावे आणि इतर ऐतिहासिक स्रोत पाहून हे सारे टीकाकार अपयशी ठरल्यामुळे असल्या विरोधकांकडे उरले ते निव्वळ आपलाच आग्रह रेटणारे युक्तिवाद. यातून हेच दिसून आले की या विरोधकांना देशाची संस्कृती, परंपरा आणि अध्यात्माचे समर्थन न करता त्याचा भूतकाळ शोधायचा होता. भारताच्या भूतकाळातील वैभव आणि तत्त्वज्ञानाचे कोणते पैलू ग्राह्य मानायचे याच्या ज्या मर्यादा पाश्चिमात्य अभ्यासकांनी ठरवून दिल्या- मग ते अभ्यासक प्राच्यविद्यावादी असोत की उत्तरवसाहतवादी असोत- त्याच जणू या विरोधकांनाही मान्य होत्या. पण याच सवयीमुळे आजतागायत आपली आपल्या राष्ट्रीय भूतकाळाचा शोध घेण्याची स्वायत्तता आणि आपली सभ्यता पुढेच नेण्याची क्षमतादेखील कमी झालेली आहे, हे या चळवळीने ओळखले. हा वैचारिक प्रवाह युरोपियन आधुनिकतेला जपतो आणि भारतीय संस्कृतीपासून दूर राहूनच ते लोक भारतीय सभ्यतेच्या कल्पना ('आयडिया ऑफ इंडिया' वगैरे) मांडात. असल्या लोकांची स्थिती खरे तर रशियाच्या झार पीटर द ग्रेटप्रमाणे- ना धड मायदेशाचा, ना धड पाश्चिमात्य- अशीच असते.'सभ्यता पुढे नेणे' असा शब्दप्रयोगी मी जाणीवपूर्वक करतो आहे. संस्कृती-सभ्यता हा अनेकदा जोडशब्द म्हणून वापरला जातो आणि काही जण तर हे दोन्ही शब्द समानार्थीच समजत असतील. पण तसे नाही. संस्कृतीशी लोकांची बांधिलकी किती आणि ती टिकवण्याच्या आकांक्षा कशा हा सभ्यतेला पुढे नेणारा एक भाग झाला. पण दुसरा तितकाच महत्त्वाचा भाग म्हणजे राज्ययंत्रणेची भूमिका! राज्ययंत्रणेने जर संस्कृतीकडे आणि आध्यात्मिकतेकडे दुर्लक्ष केले- म्हणजेच केवळ भौतिक विकासाला प्रगती मानले- तर सभ्यतेचा ऱ्हासच होतो. अशा ऱ्हास झालेल्या सभ्यतांची किती तरी उदाहरणे जगभर घडलेली आहेत. या 'सभ्यतेला पुढे नेण्या'चा समावेश स्वातंत्र्यलढ्याच्या काळातही भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने केलाच नाही... उलट, राष्ट्र-राज्याची पाश्चात्त्य कल्पना उधार घेतली! सन १८७२ ते १९४१ या पारतंत्र्य काळात ज्या आठ जनगणना झाल्या, त्या सर्व गणनांच्या अहवालांत हिंदूंच्या धर्मांतरणाच्या संथ गतीबद्दल स्पष्ट चिंता आहे.

## संपादकीय »

# ताळेबंदांचा तोल!


***कंपन्यांच्या आर्थिक लेखाजोख्यात वाढ होते आहे खरी, पण ही वाढ गेल्या ४२ महिन्यांतील सर्वात मंद असणे हे अर्थव्यवस्था मंदावल्याचे लक्षण...***

सध्याच्या उत्सवी आणि उत्साही वातावरणाचा आनंद घेत असतानाही एका तपशिलाकडे दुर्लक्ष करणे शहाण्यांस अवघड जाईल. हा तपशील म्हणजे गेल्या काही दिवसांत जाहीर झालेले जवळपास २०० कंपन्यांचे यंदाच्या आर्थिक वर्षातील तिसऱ्या तिमाहीचे ताळेबंद. आपल्याकडील नियमानुसार भांडवली बाजारात सूचिबद्ध कंपन्यांस दर तीन महिन्यांनी बाजारपेठ नियंत्रकास, म्हणजे 'सेबी'स (सिक्युरिटीज अ‍ॅण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया), सरत्या तीन महिन्यांचा ताळेबंद सादर करावा लागतो. उत्पन्न, खर्च, देणे आणि येणे इत्यादी किमान तपशील त्यात असतो आणि तो सनदी लेखापालाने मंजूर केलेला असेलच असे नाही. या अशा तिमाही ताळेबंदात त्याची तुलना त्याआधीच्या तिमाहीशी, गेल्या वर्षातील कामगिरीशी केली जाते. आपले आर्थिक वर्ष १ एप्रिल या दिवशी सुरू होते.

**भारत-म्यानमार सीमेवर कुंपण उभारण्याची घोषणा केली आहे. पण ही घोषणा त्यांनी केली आसामात. ती भिडली आहे अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर आणि मिझोरम या राज्यांना. एन. बिरेन सिंह यांनी हिंसाचाराबद्दल काही प्रमाणात म्यानमारमधून येणाऱ्या कुकी-चिन-झो निर्वासितांना जबाबदार धरले होते.**

# भारत आणि म्यानमार यांच्यात करार

मणिपूरला सीमेवर कुंपण हवे अशी किमान तेथील भाजपशासित सरकारची भूमिका आहे. या भूमिकेशी नागालँड आणि मिझोरमची सरकारे सहमत नाहीत. मिझोरमचे मुख्यमंत्री लालदुहोमा यांनी म्यानमारमधून विस्थापित झालेले चीन आणि मणिपूरमधून विस्थापित झालेले कुकी-झो यांना आश्रय देण्याचे धोरण सुरूच राहील, असे म्हटले होते. त्या राज्यात सध्या ३१ हजार चीन विस्थापित आणि १२ हजार कुकी-झो छावण्यांमध्ये राहात आहेत. परंतु मिझोराम आणि नागालँडच्या आक्षेपांची दखल केंद्राकडून घेतली जाण्याची शक्यता कमीच. सीमा सुरक्षित करण्याचा विषय हा केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतो, असे इशारावजा स्मरण केंद्राकडून सीमावर्ती राज्यांना या संदर्भात वेळोवेळी करण्यात आलेले आहे. या गुंतागुंतीच्या मुळाशी आहे म्यानमारमधील अस्थिरता आणि त्या देशाशी भारताने २०१८मध्ये केलेला मुक्त संचार करार (फ्री मुव्हमेंट रेजिम – एफआरएम).भारत आणि म्यानमार



यांच्यात २०१८मध्ये हा करार झाला. दोन्ही देशांच्या सीमावर्ती भागांत वर्षानुवर्षे अनेक जमातींचा अधिवास आहे. आंतरराष्ट्रीय सीमा आरेखित होण्यापूर्वीपासूनच त्यांच्यातील रोटी-बेटी आदी संबंध दृढ आहेत. नरेंद्र मोदी सरकारच्या 'पूर्वेस प्राधान्य' या व्यापक धोरणाअंतर्गत म्यानमार सीमेवरील मुक्त संचार धोरण अर्थात एफएमआर आखण्यात आले. त्याअंतर्गत, दोन्ही देशांच्या सीमांच्या १६ किलोमीटरपर्यंत विनाव्हिसा संचाराची परवानगी देण्यात आली. ब्रिटिशांनी १८२६मध्ये भारत आणि म्यानमार यांच्यादरम्यान सीमा आरेखित केल्यावर एक प्रकारे फाळणीच अमलात आली होती. त्यामुळे काही कुकी-झो या देशात आणि त्यांचे नातलग दुसऱ्या देशात अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली. नात्यांपलीकडे व्यापारी संबंधांचाही मुद्दा होता. जीवनावश्यक आणि इतर छोट्या-मोठ्या वस्तूंच्या व्यापाराची मोठी परंपरा या भागाला होती. या व्यापाराचे प्रमाण आणि व्याप्ती अल्प असली, तरी त्यावर एका विशाल समुदायाचा चरितार्थ अवलंबून आहे. परंतु फेब्रुवारी २०२१मध्ये म्यानमारमध्ये बंड झाले आणि मे २०२३मध्ये मणिपूरमध्ये वांशिक दंगली सुरू झाल्या. मग मुक्त संचार करार केंद्र आणि मणिपूर सरकारला अचानक सदोष वाटू लागला. त्याआधीही अनधिकृत स्थलांतरे, अमली पदार्थांची तस्करी आणि शस्त्रांच्या अवैध व्यापारामुळे या कराराविषयी नकारघंटा वाजू लागली होतीच. फेब्रुवारी २०२१मध्ये म्यानमारच्या लष्करी म्होरक्यांनी आँग सान स्यू ची यांचे निर्वाचित सरकार उलथून टाकल्यानंतर मोठ्या प्रमाणावर कुकी-झो जमातींचे नागरिक भारतात मणिपूर आणि मिझोराममध्ये आले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जा त्या लबाड नार्वेकरांना सांगा!

## उद्धव ठाकरेंची मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर बोचरी टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नाशिक येथील गोल्फ मैदानात झालेल्या ठाकरे गटाच्या जाहीर सभेत शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर बोचरी टीका केली आहे. महाराष्ट्र ओरबडला जात असताना मिंधे दिल्लीसमोर शेपूट हलवत असल्याची टीका ठाकरे यांनी केली. यावेळी उद्धव यांनी पंतप्रधान मोदी हे गुजरात आणि भारतामध्ये भिंत उभी करत असल्याचे म्हटले.**




शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे महाअधिवेशन नाशिकमध्ये पार पडले. या अधिवेशनाची सांगता गोल्फ मैदानातील जाहीर सभेने झाली. यावेळी शिवसेना ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर तोफ डागली. उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, पंतप्रधान मोदी हे देश आणि गुजरात मध्ये भिंत उभी करत आहेत.भाजपकडून महाराष्ट्र लुटला जात आहे, ओरबडला जातोय. मिंध्ये तुझ्यासमोर महाराष्ट्र लुटला जातोय आणि दिल्ली समोर शेपूट हलवत आहे अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी घणाघाती टीका केली. उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदीवरही हल्लाबोल केला. त्यांनी म्हटले की, मोदींचे दौरे वाढले आहेत. जेव्हा महाराष्ट्र संकटात होता तेव्हा मोदी आले नाही. निवडणूक आली तेव्हा महाराष्ट्र आठवतोय. मणिपूरला लोकसभेच्या दोन जागा म्हणून तिकडे गेले नाहीत. इकडे 48 जागा म्हणून येतात. महाराष्ट्रामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले. तेव्हा राज्य सरकारने मागणी करून ही निधी दिला नाही. पण, गुजरातला न मागताही निधी दिला. हिंदूमध्ये विष पेरतात. भेदभाव करतात. देशासाठी 'मन की बात' गुजरातसाठी 'धन की बात' करता अशा शब्दात ठाकरे यांनी हल्लाबोल केला. मोदी देश आणि गुजरातमध्ये भिंत उभी करत आहेत. मोदी हे योग्य नाही, असलं हिंदुत्व आम्हाला मान्य नाही असेही ठाकरे यांनी म्हटले. उद्धव ठाकरे यांनी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांवर तपास यंत्रणांकडून होत असलेल्या कारवाईवर भाष्य केले. त्यांनी म्हटले की, माझ्याकडे कार्यकर्ते पळणारे नाहीत. माझ्या कार्यकर्त्यांच्या घरी धाडी घालतात. घर कार्यकर्त्यांचे आणि त्यामध्ये हे अधिकारी तंगड्या पसरून बसतात.आमचे सरकार आल्यावर ह्याच तंगड्या गळ्यात घालणार असल्याचाही हल्लाबोल ठाकरे यांनी केला. भाजप म्हणजे भेकड जनता पार्टी आहे. यंत्रणांचा वापर करतात,आमचे संरक्षण काढले हे समोर माझे (शिवसैनिक) सुरक्षा कवच असल्याचे त्यांनी म्हटले. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी आमदार अपात्रताप्रकरणी महत्त्वाचा निकाल सुनावला. तसंच, मूळ शिवसेनेचा दर्जाही शिंदे गटाला दिला. यावरून ठाकरे गटात अद्यापही खदखद सुरू आहे. नाशिकमध्ये झालेल्या जाहीरसभेतही उद्धव ठाकरे यांनी राहुल नार्वेकर यांचा एकेरी उल्लेख करून आव्हान दिलं आहे. जमलेल्या लोकांना उद्देशून उद्धव ठाकरे म्हणाले, तुम्हीच मला सांगा की मी एकतरी बाळासाहेबांचा विचार सोडला आहे का? तुम्ही म्हणाल तर मी आहे ते पदही सोडायला तयार आहे. जसं मी मुख्यमंत्री पद सोडलं.पुढे ते म्हणाले, जा त्या लबाड नार्वेकरला सांगा, हिंमत असेल तर येथे ये आणि सांग शिवसेना कोणाची? बंद दाराआड निर्णय देता. आम्ही सर्व पुरावे जनता न्यायालयात दिले आहेत. शिवसेनेची घटना मिळालीच नाही असं म्हणणारे गृहस्थच तिथे २०१३ साली उभे होते. हे आता म्हणतायत मी पक्षप्रमुखच नाही. पण तेच त्यावेळी दाढी खाजवत माझ्या पाया पडले होते, असा टोलाही त्यांनी लगावला.

### बाळासाहेब नाही राहिले...

“लोकांचे आशीर्वाद हीच माझ्या शिवसेनेची घटना आहे. भाजपाकडे शंकराचार्यांना मान नाही, मित्रांना स्थान नाही. आज बाळासाहेबांचे विचार सोडले असं त्यांचं म्हणणं असेल तर त्यांनी शिवेसनेशी युती का तोडली?” असा सवालही ठाकरेंनी विचारला. “नाथाभाऊंनी नाशिकमध्येच सांगितलं आहे. मे २०१४ पर्यंत आग मेरे गले लग जा अशी परिस्थिती होती. राष्ट्रपतींच्या पाठिंब्याच्या पत्रावर सही करायला मी दिल्लीत गेलो होते. जूनचा महिना होता. तोपर्यंत शिवसेना हिंदुत्त्ववादी होती. मग जून ते ऑक्टोबर आम्ही असं काय धर्मांतर केलं की तुम्ही शिवसेनाबरोबरची युती तोडली”, असा सवालही उद्धव ठाकरेंनी विचारला.“भाजपाची एक जबाबदार व्यक्ती आहे. २०१४ ला भाजपाने युती तोडल्यानंतर शिवसेनेचे ६३ आमदार महाराष्ट्राने निवडून दिले. निवडणुका झाल्यानंतर तीच जबाबदार व्यक्ती माझ्याकडे आली आणि त्यांनी स्वच्छ शब्दांत सांगितलं की त्यांना माझं अभिनंदन करायचं आहे. दिल्लीमध्ये अशी चर्चा होती की बाळासाहेब तर नाही राहिले. त्यांना असं वाटत होतं की बाळासाहेब गेले. पण आजही बाळासाहेब आमच्या मनात आहेत. पण २०१४ साली दिल्लीत हा विचार चालला होता की बाळासाहेब नाही राहिलेत, तर उद्धव ठाकरे काय करू नाही शकणार.

# मराठा समाजाला आरक्षण कधी मिळणार : आमदार कडू

## मराठा समाजाचं मागसलेपण तपासण्यासाठी राज्यात सर्वेक्षण

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा आंदोलन सुरू केलं आहे. जरांगे पाटील यांनी २० जानेवारीपासून बीडमधून पदयात्रेला सुरुवात केली आहे. त्यांच्या सहकाऱ्यांना आणि मराठा समाजबांधवांना घेऊन ते मुंबईत जाणार आहेत. जरांगे पाटील शुक्रवारी (२६ जानेवारी) मुंबईत चक्काजाम आंदोलन करून आझाद मैदानात दाखल होतील. दरम्यान, आज त्यांची पदयात्रा शिरूरमध्ये दाखल झाली.**

यावेळी जरांगे पाटील म्हणाले, मराठा आरक्षण आता अंतिम टप्प्यात असून या लढाईसाठी सर्वांनी मोठ्या संख्येने मुंबईत यावं. संपूर्ण मराठा समाजाने आपल्यातील एकजूट कायम ठेवावी. अशी आमची मागणी आहे. आम्हाला गोळ्या घातल्या तरी आम्ही मागे हटणार नाही. आम्ही आरक्षण घेतल्याशिवाय मागे फिरणाार नाही.दरम्यान, प्रहार जनशक्ती पार्टीचे सर्वेसर्वा आणि अचलपूरचे आमदार बच्चू कडू हेदेखील या आंदोलनात सहभागी होणार आहेत. त्यांनी स्वतः याबाबतची माहिती दिली आहे. तत्पूर्वी बच्चू कडू म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांच्यावर बंदुकीच्या गोळ्यांची भाषा करण्याची वेळ येणार नाही.



मनोज जरांगे पाटील यांनी केलेली मागणी राज्य सरकारने मान्य केली आहे. ५४ लाख मराठ्यांना कुणबी जातप्रमाणपत्रं देण्याची मागणी केली होती. त्यापैकी ३९ लाख प्रमाणपत्रं वाटली आहेत. आता केवळ १५ लाख प्रमाणपत्रांचा विषय बाकी आहे. तो प्रश्नदेखील लवकरच सुटेल. त्यामुळे त्यांच्यावर गोळ्यांची भाषा करण्याची वेळ येणार नाही. मी एक आदोलक बनून मनोज जरांगे पाटील यांच्या आदोलनात सहभागी होणार आहे.आमदार बच्चू कडू म्हणाले, मराठा समाजाचं मागासलेपण तपासण्यासाठी राज्यात सर्वेक्षण सुरू झालं आहे. लवकरच ते सर्वेक्षण पूर्ण होईल. यापैकी काही नमुन्यांची तपासणी केली जाईल. त्यानंतर फेब्रुवारी महिनाअखेरपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळेल. दुसऱ्या बाजूला, शिरूरमध्ये दाखल होताच मनोज जरांगे म्हणाले, “मराठा समाजाच्या प्रगतीसाठी आणि लेकरांच्या भविष्यासाठी सरकारने शहाणपणाची भूमिका घ्यावी. शरीर साथ देत नसताना जातीसाठी, समाजासाठी जीवाची पर्वा न करता आम्ही आंदोलन करत आहोत. मराठ्यांचा ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत.

### 39 लाख प्रमाणपत्रं वाटली

प्रहार जनशक्ती पार्टीचे सर्वेसर्वा आणि अचलपूरचे आमदार बच्चू कडू हेदेखील या आंदोलनात सहभागी होणार आहेत. त्यांनी स्वतः याबाबतची माहिती दिली आहे. तत्पूर्वी बच्चू कडू म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांच्यावर बंदुकीच्या गोळ्यांची भाषा करण्याची वेळ येणार नाही. मनोज जरांगे पाटील यांनी केलेली मागणी राज्य सरकारने मान्य केली आहे. ५४ लाख मराठ्यांना कुणबी जातप्रमाणपत्रं देण्याची मागणी केली होती. त्यापैकी ३९ लाख प्रमाणपत्रं वाटली आहेत.

# ईलॉन मस्कची लवकरच भारतात एन्ट्री!

## ईलॉन मस्कच्या कंपनीला सरकारकडून परवाना मिळणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**टेस्लाचे मालक आणि जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती ईलॉन मस्कच्या (ELON MUSK) आणखी एका कंपनीची लवकरच भारतात एन्ट्री होणार आहेत. ही एंट्री टेस्लामार्फत नसून सॅटेलाइट इंटरनेट कंपनी स्टारलिंकच्या (STARLINK) माध्यमातून होणार आहे. स्टारलिंकला लवकरच नियामक मान्यता मिळणार असल्याचे मानले जात आहे. याबाबतचा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. परवाना मिळताच कंपनी भारतात काम सुरू करेल. स्टारलिंक्च्या आगमनाने दुर्गम भाग आणि ग्रामीण भागातील कनेक्टिव्हिटीची स्थिती सुधारू शकते.**



ईलॉन मस्कची स्टारलिंक आपल्या शेअरहोल्डिंग पॅटर्नची माहिती उद्योग आणि अंतर्गत व्यापार विभागासमोर देणार आहे. यानंतर त्याच्या कंपनीला दूरसंचार विभागाकडून (DOT) ऑपरेटिंग प्रमाणपत्र मिळेल. त्यानंतर दूरसंचार विभागाकडून दूरसंचार सचिव नीरज मित्तल आणि संचार मंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र पाठवले जाईल. मंत्रालयाची मंजुरी मिळाल्यानंतर, सॅटेलाइट कम्युनिकेशन्स विंगद्वारे स्टारलिंकला एक मान्यता पत्र जारी केलं जाईल.स्टारलिंकने 2022 मध्ये सॅटेलाइट सर्व्हिसेस (GMPCS) द्वारे ग्लोबल मोबाइल पर्सनल कम्युनिकेशन्ससाठी अर्ज केला होता. मंजुरी मिळाल्यानंतर वनवेब आणि रिलायन्स जिओनंतर हा परवाना मिळवणारी ती तिसरी कंपनी ठरेल.स्टारलिंक त्याच्या ग्राहकांना 25 ते 220 MBPS पर्यंत डाउनलोड गती प्रदान करते. त्यांचा अपलोड स्पीड सुमारे 5 ते 20 एमबीपीएस असल्याचा दावा कंपनीने केला आहे. स्टारलिंक वेबसाइटचा दावा आहे की बहुतेक ग्राहक 100 MBPS पेक्षा जास्त डाउनलोड स्पीडचा आनंद घेत आहेत. सध्या भारतातील दुर्गम भागात टॉवर्सच्या ऑप्टिकल फायबरद्वारे एवढा वेग मिळणे अवघड आहे. स्टारलिंक उपग्रहाद्वारे इंटरनेट पुरवत असल्याने ते 5G ऐवजी 4G गती प्रदान करण्यास सक्षम असेल अशी अपेक्षा आहे. स्टारलिंकने सध्या भारतासाठी दर निश्चित केलेले नाहीत. पण हाती आलेल्या एका अहवालानुसार, त्याची किंमत पहिल्या वर्षी सुमारे 1.58 लाख रुपये आणि दुसऱ्या वर्षी 1.15 लाख रुपये असू शकते. त्यावर 30 टक्के करही भरावा लागणार आहे. यामध्ये उपकरणाची किंमत 37,400 रुपये असून दरमहा 7,425 रुपये आकारले जाऊ शकतात.भारत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा कायमस्वरुपी सदस्य नाही. कायमस्वरुपी सदस्यत्वासाठी भारताने अनेकदा आपली दावेदारी सिद्ध केली आहे. यासाठी जगातल्या सर्वात श्रीमंत व्यक्तीने भारताला पाठिंबा दर्शवला आहे. टेस्ला, स्पेसएक्स आणि एक्सचे मालक एलॉन मस्क यांनी जगातल्या शक्तीशाली देशांना आरसा दाखवत भारताची पाठराखण केली आहे. मस्क म्हणाले, जगातला सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असूनही भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचं स्थायी सदस्यत्व न देणं हा वेडेपणा आहे. एलॉन मस्क यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये म्हटलं आहे की, सयुंक्त राष्ट्रांच्या संस्थांमध्ये सुधारणांची आवश्यकता आहे. परंतु, ज्यांच्याकडे ताकद आहे त्यांना त्या जुन्या गोष्टी सोडायच्या नाहीत. पृथ्वीवरील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असूनही भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचं स्थायी सदस्यत्व दिलेलं नाही. हा सगळा वेडेपणा आहे. परिषदेत आफ्रिका खंडातील देशांसाठी एक जागा असायला हवी.मायकल आयजेनबर्ग यांच्या पोस्टवर रिप्लाय देत मस्क यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेविषयी आपलं मत मांडलं आहे. आयजेनबर्ग यांनी संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्या एका वक्तव्यावर एक प्रतिक्रिया दिली होती. त्यावरच मस्क यांनीदेखील आपलं मत मांडलं. अँटोनियो गुटेरेस यांनी आफ्रिकेसाठीच्या एका स्थायी सदस्यत्वावर भाष्य केलं होतं. यावर आयजेनबर्ग म्हणाले, मग भारताबद्दल तुम्ही काय बोलणार आहात? मला असं वाटतं की, सध्याची यूएन सुरक्षा परिषद बरखास्त करावी आणि नव्या नेतृत्वांसह नवीन समिती तयार करावी. भारत हा गेल्या १६ वर्षांमध्ये आठ वेळा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा अस्थायी सदस्य होता. तसेच भारत जी-४ समुहाचाही सदस्य आहे.

### संयुक्त राष्ट्रांमध्ये 51 संस्थापक सदस्य

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत म्हटलं होतं की, जेव्हा संयुक्त राष्ट्रांची स्थापना करण्यात आली होती तेव्हा जगाची परिस्थिती वेगळी होती. आज सर्व देश ज्या स्थानावर आहेत तशी परिस्थिती तेव्हा नव्हती. तसेच त्यावेळी संयुक्त राष्ट्रांमध्ये ५१ संस्थापक सदस्य होते. आज संयुक्त राष्ट्रांमधील सदस्य देशांची संख्या जवळपास २०० इतकी आहे. परंतु, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्य देशांची संख्या तेवढीच आहे. यात नवे देश समाविष्ट केले नाहीत.

# काँग्रेस कार्यकर्ते अन् पोलिसांमध्ये झटापट

## मुख्यमंत्र्याकडून राहुल गांधींवर गुन्हा दाखल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आसाममधील गुवाहाटी येथे काँग्रेस कार्यकर्ते आणि पोलीस समोरा-समोर आले होते. याप्रकरणी मुख्यमंत्री हिंमता बिस्व सरमा यांनी काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. जमावाला भडकवल्याचा आरोप हिंमता बिस्व सरमा यांनी राहुल गांधींवर केला आहे.**



राहुल गांधींची 'भारत जोडो न्याय यात्रा' आसाममध्ये आहे. ही यात्रा गुवाहाटी शहरातून जाणार होती. पण, वाहतूक कोंडीच्या कारणास्तव यात्रेला शहरात प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली होती. तरीदेखील कार्यकर्ते जमा झाले आणि पोलिसांनी लावलेले बॅरिगेट्स तोडण्यात आले. पोलिसांनी काँग्रेस कार्यकर्त्यांवर लाठीचार्ज केला. यावेळी पोलीस आणि कार्यकर्ते समोरा-समोर आले.यानंतर संबोधित करताना राहुल गांधींनी बॅरिगेट्स तोडलेल्या कार्यकर्त्यांना 'बब्बर शेर' असं म्हटलं. "आम्ही बॅरिगेट्स तोडले आहेत. पण, कायदा हातात घेणार नाही," असं राहुल गांधी म्हणाले. या घटनेनंतर हिंमता बिस्व सरमा यांनी 'एक्स' अकाउंटवर ट्वीट करत राहुल गांधी आणि कार्यकर्त्यांवर 'असभ्य वर्तन' आणि 'नक्षलवादी डावपेच' वापरल्याचा आरोप केला. हिंमता बिस्व सरमा म्हणाले, "हे आसामी संस्कृतीचा भाग नाही. आमचे राज्य शांतताप्रिय आहे. अशा नक्षलवादी डावपेचात आणि आमच्या संस्कृतीत खूप फरक आहे. राहुल गांधींनी जमावाला चिथावणी दिल्याबद्दल डीजीपींना व्हिडीओ पाहून गुन्हा नोंद करण्याचे निर्देश दिलेत. तुमच्या असभ्य वर्तनामुळे गुवाहाटीत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे."याला राहुल गांधींनी प्रत्युत्तर दिलं आहे. "आसामचे मुख्यमंत्र्यांनी यात्रेला केलेल्या विरोधाचा आम्हालाच फायदा होत आहे. यात्रेला प्रसिद्धी देण्यासाठी आसामचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आम्हाला मदत करत आहे. आसामचे मुख्यमंत्री धमकवण्याचं काम करत आहेत. पण, आमचा न्याय यात्रेचा संदेश जनतेपर्यंत पोहचत आहे. यात्रा का थांबवली जातेय? असा सवाल जनतेतून विचारला जात आहे."राहुल गांधींची 'भारत जोडो न्याय यात्रा' आसाममध्ये आहे. ही यात्रा गुवाहाटी शहरातून जाणार होती. पण, वाहतूक कोंडीच्या कारणास्तव यात्रेला शहरात प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली होती.


# 'जननायक' कर्पूरी ठाकूर यांना मरोणत्तर भारतरत्न

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

बिहारचे माजी दिवंगत मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर (KARPOORI THAKUR) यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जाहीर केलेल्या निवेदनात ही घोषणा करण्यात आली आहे. दीर्घ काळापासून कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्न दिला जावा अशी मागणी होत होती. जी आता पूर्ण झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या निर्णयाबाबत आनंद व्यक्त केला आहे. बिहारचे जननायक अशी त्यांची ओळख होती. कर्पूरी ठाकूर यांचा जन्म १९२४ मध्ये झाला होता. बिहार राज्याचे ते पहिले बिगर काँग्रेसी मुख्यमंत्री होते. कर्पूरी ठाकूर हे बिहारचे दोनदा मुख्यमंत्री आणि एकदा उपमुख्यमंत्री होते. मोदी यांनी एक्सवर पोस्ट करुन लिहिलं आहे की मला या गोष्टीचा आनंद आहे की सामाजिक न्यायाचे प्रतीक असलेले महान जननायक कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या जन्माचं हे शताब्दी वर्ष आहे आणि त्याच वर्षात ही बातमी आली आहे.समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्न जाहीर झाल्याबद्दल पोस्ट लिहिली आहे. जननायक कर्पूरी ठाकूर यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. सामाजिक न्यायाच्या आंदोलनाचा हा विजय आहे असं अखिलेश यादव यांनी म्हटलं आहे. बिहार विधानसभेत १९५२ मध्ये कर्पूरी ठाकूर हे पहिल्यांदा आमदार झाले होते. त्यानंतर ते कधीही आमदारकीची निवडणूक हरले नाहीत. १९६७ मध्ये देशातल्या नऊ राज्यांमध्ये बिगर काँग्रेसची सरकारं आली. त्यावेळी बिहारच्या महामाया सरकारमध्ये कर्पूरी ठाकूर हे शिक्षण मंत्री आणि उपमुख्यमंत्री होते.

# 'फायटर' चित्रपटाच्या ट्रेलरची शाहरुख खानला भुरळ




सध्या हृतिक रोशन व दीपिका पदुकोणच्या 'फायटर' या चित्रपटाची चहूबाजूने चर्चा सुरू आहे. प्रदर्शित होण्यापूर्वीच हा चित्रपट बक्कळ कमाई करताना दिसत आहे. 'फायटर' चित्रपटाचा टीझर, ट्रेलर, गाणी या सगळ्यांनी प्रेक्षकांना वेड लावलं आहे. इतकंच नाही तर या चित्रपटाच्या ट्रेलरची भुरळ बॉलीवूडच्या बादशहाला देखील पडली आहे. याबद्दलचा किस्सा 'फायटर' चित्रपटाचा निर्माता सिद्धार्थ आनंदने सांगितला. निर्माता सिद्धार्थ आनंद म्हणाला, "न्यूज १८ या वृत्तसंस्थेला सांगताना शाहरुख म्हणाला की, त्याला फायटरचा ट्रेलर खूप आवडला. खरंतर ट्रेलर प्रदर्शित झाला, त्याच दिवशी आम्ही दोघं भेटलो होतो. तेव्हाच त्याने मला सांगितलं होतं की, चित्रपटातील खलनायकाचा लूक आणि स्टंट्स त्याला खूप आवडले. शिवाय सीजीआय (CGI) आणि वीएफएक्सचं (VFX) काम उत्तमरित्या झालं आहे."पुढे सिद्धार्थ म्हणाला की, 'पठाण'च्या यशामुळे फायटरकडून प्रेक्षकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. पण, मी 'पठाण' आणि 'फायटर'मध्ये कोणतीच तुलना करू इच्छित नाही. ब्लॉकबास्टर 'पठाण' या सिनेमासाठी निर्माता सिद्धार्थ आनंद आणि शाहरुख खान यांनी पहिल्यांदाच एकत्रित काम केलं होत. या चित्रपटाने जगभरात १००० कोटींहून अधिक कमाई केली होती. दरम्यान, बहुप्रतीक्षित व बहुचर्चित 'फायटर' २५ जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

# सैफ अली खानला मिळाला डिस्चार्ज

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानने त्याच्या हटके चित्रपटातून प्रेक्षकांचं भरपुर मनोरंज केलं आहे, नुकतीच त्याच्या प्रकृतीबद्दल नवीन माहिती समोर आली होती. सैफ अली खानला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सोमवारी सकाळी आठच्या सुमारास त्याला कोकिलाबेन रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचंही डॉक्टरांनी स्पष्ट केलं होतं. अभिनेत्याच्या खांद्यालाही फ्रॅक्चर झाल्याचे स्पष्ट झाले होते. सैफसोबत त्याची पत्नी व बॉलिवूड अभिनेत्री करीना कपूर खान देखील रुग्णालयात उपस्थित होती. सैफच्या गुढग्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करावे लागले असल्याचं स्पष्ट झालं. डॉक्टरांनी कालपर्यंत काहीच माहिती देण्यास नकार दिला होता. अशातच नुकतंच सैफला डिस्चार्ज देण्यात आला असून त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर चर्चेत आहे.रुग्णालयातून बाहेर पडत असताना त्याने मीडियाशी संवाद साधला अन् आपल्या तब्येतीविषयी माहितीही दिली. 'झुम'शी संवाद साधताना सैफ म्हणाला, "माझ्या गूढग्यावर शस्त्रक्रिया झालेली नाही किंवा माझ्या पाठीला दुखापत झालेली नाही. अशा बऱ्याच अफवा समोर येत आहेत. माझ्या मनगटाला दुखापत झाली होती अन् गेले बरेच दिवस मी त्यावर उपचार घेत आहे. कधी कधी वेदना ह्या फारच होतात त्यामुळे रुग्णालयात यावं लागतं."पुढे सैफ म्हणाला, "हे नेमकं किती गंभीर आहे ते मलाही माहीत नाही.



# 'इमर्जन्सी' चित्रपट 'या' तारखेला होणार प्रदर्शित

कंगना रणौत बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आतापर्यंत तिने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. सध्या कंगना तिच्या 'इमर्जन्सी' चित्रपटामुळे चर्चेत आहे. ती या चित्रपटात इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत दिसणार आहे. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला होता. प्रेक्षकांकडून या ट्रेलरला चांगला प्रतिसाद मिळाला होता. तेव्हापासून प्रेक्षक 'इमर्जन्सी' चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख समोर आली आहे.कंगनाने आपल्या इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करीत 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेची घोषणा केली आहे. पोस्टमध्ये कंगनाने 'इमर्जन्सी' चित्रपटातील आपल्या लूकचा फोटो शेअर केला आहे. हा फोटो शेअर करीत तिने लिहिले, "आता भारतातील सर्वांत भयंकर काळाच्या कथेवरचा पडदा उघडणार आहे. हा चित्रपट १४ जून २०२४ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. सर्वांत निर्भय आणि उग्र पंतप्रधानांच्या कथेचे साक्षीदार व्हा." कंगनाचा 'इमर्जन्सी' चित्रपट येत्या १४ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. कंगनाची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे.दरम्यान 'इमर्जन्सी' चित्रपट गेल्या वर्षी २४ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार होता; परंतु त्या काळात कंगनाचे एकापाठोपाठ एक चित्रपट आले असल्यामुळे 'इमर्जन्सी' चित्रपटाची तारीख पुढे ढकलण्यात आली होती. कंगनाने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करीत याबाबत माहितीही दिली होती. आता हा चित्रपट १४ जूनला प्रदर्शित करण्यात येणार आहे. २५ जून १९७५ रोजी भारतात 'इमर्जन्सी' लावण्यात आली होती. त्यामुळे हा चित्रपट जून महिन्यातच प्रदर्शित करण्यात येणार आहे.



# नोरा फतेहीचा डीपफेकचा व्हायरल व्हिडिओ!

नोरा फतेही सध्या एका प्रकरणामुळे खूप चर्चेत आली आहे. तिने इंटरनेटवर एक व्हिडिओ पाहिला. या व्हिडिओत स्वत: नोरा होती. मात्र या व्हिडिओतील काही दृश्ये पाहून नोराला मोठा धक्का बसला. ही व्हिडिओ डिपफेक असल्याचा आरोप करत तिने यामध्ये मी नाही असे स्पष्टपणे जाहीर केले आहे. नोराच्या आरोपांनंतर तिचा व्हिडिओ खूप चर्चेत आला, मात्र ती सुद्धा डीपफेक प्रकरणाची शिकार बनली आहे. नोराने सोशल मीडियावर पोस्ट करत याबाबत माहिती दिली आहे. एआयच्या मदतीने सध्या होत असलेले डीपफेक व्हिडिओ (DEEPFAKE VIDEO) प्रकरणांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. हा डीपफेक प्रकार थांबायचे नाव घेत नाही. रश्मिका मंदान्ना, कॅटरिना कैफ, आलिया भट्ट, काजोल यांच्यानंतर आता अभिनेत्री नोरा फतेही या व्हिडिओची शिकार झाली आहे. प्रसिद्ध डान्सर आणि बॉलिवूड अभिनेत्री नोरा फतेहीची डीपफेक व्हिडिओ समोर आल्यानंतर नोराला धक्का बसला आहे. सोशल मीडियावर नोराचा डीपफेक व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे. नोरा फतेहीने स्वत: तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर ही माहिती दिली आहे. या व्हिडिओत ती म्हणते की, हा व्हिडिओ पाहून मला धक्का बसला आहे. व्हायरल होणाऱ्या डीफफेक व्हिडीओमध्ये, नोरा एका प्रोडक्टची जाहिरात करताना दिसत आहे. नोरा फतेहीचा चेहरा वापरून एक डीपफेक व्हिडिओ बनवण्यात आला असून तो व्हायरल होत आहे.

# आयसीसी संघातून रोहित-विराटला डच्चू!

## » रुटचा चौथ्यांदा आयसीसी कसोटी संघात समावेश

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) 2023 चा सर्वोत्तम कसोटी संघ जाहीर केला आहे. संघाचे नेतृत्व पॅट कमिन्सकडे सोपवण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी या संघावर वर्चस्व गाजवले आहे. त्यांच्या पाच खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. तर भारत आणि इंग्लंडचे प्रत्येकी दोन, श्रीलंका आणि न्यूझीलंडचा प्रत्येकी एक खेळाडू या संघात स्थान मिळवण्यात यशस्वी झाले आहेत. ऑस्ट्रेलियाने गेल्या वर्षी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले होते. 2023 मध्ये संघातील अनेक खेळाडूंची कामगिरी अप्रतिम राहिली. परिणामी आयसीसी संघात कांगारू खेळाडूंचा दबदबा स्पष्टपणे दिसून येत आहे.**



आयसीसीने 2023 सालचा सर्वोत्तम कसोटी संघ जाहीर केला आहे. यात पाच ऑस्ट्रेलियन खेळाडूंना स्थान मिळाले असून पॅट कमिन्सला संघाचा कर्णधार बनवण्यात आले आहे. भारताचे रवींद्र जडेजा आणि रविचंद्रन अश्विन हे दोन खेळाडू या संघात स्थान मिळवण्यात यशस्वी ठरले आहेत. कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या स्टुअर्ट ब्रॉडलाही संघात संधी देण्यात आली आहे. पाकिस्तानच्या एकाही खेळाडूला स्थान मिळालेले नाही. आयसीसी दरवर्षी तिन्ही फॉरमॅटमधील सर्वोत्तम पुरुष आणि महिला संघ निवडते. जगभरातील 11 खेळाडूंना या संघांमध्ये स्थान मिळते. मंगळवारी (दि. 23) आयसीसीने 2023 चा सर्वोत्कृष्ट कसोटी संघ जाहीर केला. ओपनिंगची जबाबदारी उस्मान ख्वाजा (ऑस्ट्रेलिया) आणि दिमुथ करुणारत्ने (श्रीलंका) यांच्याकडे देण्यात आली आहे. गेल्या वर्षी ख्वाजाने 13 सामन्यांत 52.60 च्या सरासरीने 1210 धावा केल्या. यामध्ये सहा शतके आणि सहा अर्धशतकांचा समावेश आहे. करुणारत्नेनेही गतवर्षी श्रीलंकेसाठी शानदार फलंदाजी केली. त्याने 60.8 च्या सरासरीने 608 धावा केल्या. केन विल्यमसन (न्यूझीलंड) तिसऱ्या क्रमांकावर आणि जो रूट (इंग्लंड) चौथ्या क्रमांकावर आहे. संघात ट्रॅव्हिस हेड (ऑस्ट्रेलिया), रवींद्र जडेजा (भारत) आणि रविचंद्रन अश्विन (भारत) हे तीन अष्टपैलू खेळाडू आहेत. 33 वर्षीय विल्यमसनने 2023चा शेवट 695 धावांसह केला. या काळात त्याने चार शतके झळकावली. विल्यमसनशिवाय रूटनेही शानदार फलंदाजी केली. त्याचा चौथ्यांदा वर्षातील सर्वोत्तम कसोटी संघात समावेश करण्यात आला आहे. याशिवाय तो वर्षातील सर्वोत्तम कसोटीपटू पुरस्काराच्या शर्यतीत आहे. हेडच्या अष्टपैलू क्षमतेमुळे त्याला संघात स्थान मिळाले. हेडने गेल्या वर्षी 12 सामन्यांत 919 धावा केल्या. भारताच्या रवींद्र जडेजाने चकवा देणारी गोलंदाजी आणि गरज असताना शानदार फलंदाजीच्या जोरावर सर्वोत्तम कसोटी संघात स्थान मिळवले. त्याचबरोबर ॲलेक्स कॅरीने गेल्या वर्षी आपल्या यष्टिरक्षण कौशल्याने सर्वांची मने जिंकली होती. त्याने विकेटमागे एकूण 54 बळी घेतले. यामध्ये 44 झेल आणि 10 स्टंपिंगचा समावेश आहे. कॅप्टन कमिन्सने पहिल्यांदाच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व करत त्यांना चॅम्पियन बनवले. तसेच ॲशेस राखण्यात यश मिळविले. गेल्या वर्षी त्याने 11 सामन्यांत 42 विकेट घेतल्या होत्या.भारताचा अश्विन गेल्या वर्षी बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज होता. त्याने चार सामन्यांत 25 बळी घेतले होते. गेल्या वर्षी चमकदार गोलंदाजी करूनही अश्विनला डब्ल्यूटीसी फायनलच्या प्लेइंग-11 मध्ये स्थान मिळविता आले नव्हते, पण आयसीसीने अशी चूक केली नाही. त्याचबरोबर स्टार्कने 2023 मध्ये नऊ सामन्यांत 38 विकेट घेतल्या होत्या. यामध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या स्टुअर्ट ब्रॉडच्या नावाचाही समावेश आहे. गेल्या वर्षी त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ॲशेसमध्ये सर्वाधिक 22 विकेट घेतल्या होत्या. दुसरीकडे आयसीसीने आपल्या कसोटी संघात पाकिस्तान, बांगलादेश, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेचा एकाही खेळाडूला स्थान दिलेले नाही.

### स्टार्कची घातक गोलंदाजी

» अश्विन गेल्या वर्षी बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज होता. त्याने चार सामन्यांत 25 बळी घेतले होते. गेल्या वर्षी चमकदार गोलंदाजी करूनही अश्विनला डब्ल्यूटीसी फायनलच्या प्लेइंग-11 मध्ये स्थान मिळविता आले नव्हते, पण आयसीसीने अशी चूक केली नाही. यामध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या स्टुअर्ट ब्रॉडच्या नावाचाही समावेश आहे. गेल्या वर्षी त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ॲशेसमध्ये सर्वाधिक 22 विकेट घेतल्या होत्या. दुसरीकडे आयसीसीने आपल्या कसोटी संघात पाकिस्तान, बांगलादेश, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेचा एकाही खेळाडूला स्थान दिलेले नाही.

# 'राज्य क्रीडा पुरस्कारां'च्या यादीत सात खेळांचा समावेश करा

## » खेळावर आणि खेळाडूंवर अन्याय होऊन चालणार नाही : अजित पवार

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराकरिता (SHIV CHHATRAPATI AWARD) पात्र क्रीडाप्रकारांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या गोल्फ, पॉवरलिफ्टींग, बॉडीबिल्डींग, कॅरम, बिलीयर्डस अँड स्नूकर, यॉटींग आणि इक्वेस्टेरियन या सात क्रीडाप्रकारांना पुन्हा शिवछत्रपती पुरस्कारासाठी पात्र ठरवण्यात यावे. तसेच जिम्नॅस्टिकमधील उपप्रकार असलेल्या एरोबिक्स व ॲक्रोबॅटिक्स या क्रीडा प्रकारांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांच्या यादीत नव्याने सामावेश करावा.**

असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिंम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिले. यंदाच्या (सन 2022-2023) पुरस्कारांसाठी फेरसमाविष्ट केलेल्या क्रीडा प्रकारातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने तातडीने मागवून तेही विचारात घ्यावेत, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या. राज्य शासनाने अलिकडे जारी केलेल्या सुधारित शासन निर्णयात, गोल्फ, पॉवरलिफ्टींग, बॉडीबिल्डींग, कॅरम, बिलीयर्डस अँड स्नूकर, यॉटींग आणि इक्वेस्टेरियन या सात क्रीडाप्रकारांना वगळण्यात आले होते. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या खेळांच्या संघटनांनी त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्याबाबत तसेच त्यांच्या खेळांचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी पात्र क्रीडाप्रकारांमध्ये समावेश करण्याबाबत क्रीडा संचालनालयास पत्रव्यवहार केला होता. महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



बैठकीला क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, उद्योगमंत्री उदय सामंत, क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे क्रीडा विभागाचे आयुक्त सुहास दिवसे, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे उपाध्यक्ष संजय शेटे, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे महासचिव नामदेव शिरगावकर (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), अरुण केदार, अजित सावंत (कॅरम), संजय सरदेसाई, संजय माधवमहेंद्र चेंबुरकर, देवेंद्र जोशी, क्षितीज वेदक (बिलियर्ड्स आणि स्नूकर), विजय झगडे, राजेश सावंत (बॉडीबिल्डींग), विठ्ठल शिरगावकर (मॉर्डन नेन्थोलॉन) आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, कोणताही खेळाडू तो खेळत असलेल्या क्रीडा प्रकारात यश मिळविण्यासाठी त्याची उमेदीची वर्षे खर्च करतो. आपले सर्वस्व पणाला लावतो. आपल्या कौशल्य, मेहनतीच्या बळावर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर राज्यासह देशाचे नाव उज्वल करतो. अशा खेळाडूंच्या क्रीडा कामगिरीचा गौरव करण्यासाठी राज्य सरकारच्यावतीने शिवछत्रपती पुरस्कार देण्यात येतात, त्यामुळे कुठल्याही खेळावर आणि खेळाडूंवर अन्याय होऊन चालणार नाही.

### अजित पवार काय म्हणाले ?

» राज्य क्रीडा पुरस्कारासाठी पात्र असलेल्या 44 खेळांपैकी, वगळण्यात आलेल्या इक्वेस्टेरियन, पॉवरलिफ्टींग, बॉडीबिल्डींग, कॅरम, बिलीयर्डस अँड स्नूकर व यॉटींग या सात खेळांना पुन्हा यादीत सामावून घेण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.